# शहरीकरण आणि झोपडपट्टीची समस्या

**प्रियांका आबासो शिंदे** राज्यशास्त्र अधिविभाग,शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

........................................................................................................

**गोषवारा**

प्रस्तूत शोधनिबंधामध्ये शहरीकरण आणि शहरीकरणाचा एक महत्त्वाचा घटक म्हणजे झोपडपट्टीची समस्या याचा अभ्यास करण्यात आला आहे. स्थलांतर, औदयोगिकरण, नागरीकरण यामुळे झोपडपट्टयांची समस्या वाढत असल्याचे आढळते. नागरीकरण झाल्यानंतर झोपडपट्टीवासीय हे एक शहरीकरणाचे वैशिष्टय झालेले दिसून येते. सामाजिक जीवनामध्ये आपले आयुष्य जगत असताना झोपडपट्टी वासीयांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. झोपडपट्टीवासीय हे एक समाजाचा हिस्सा बनून राहतात आणि हळूहळू झोपडपट्टीवासीय हे नागरीकरणाच्या परिणामाचा एक अविभाज्य घटक बनून जातात.

**मुख्य शब्द**

झोपडपट्टी, शहरीकरण, औदयोगिकरण, समस्या

**प्रस्तावना**

प्रस्तुत शोधनिबंधामध्ये शहरीकरण आणि झोपडपट्टीची समस्या यांचा अभ्यास करण्यात आला आहे. शहरीकरणाची वाढती गती आणि त्यामुळेच रोजगाराची संधी निर्माण झाल्यामुळे लोकांचे शहरात झालेले स्थालंतर, लोकसंख्यावाढ आणि त्यामुळे होणारी झोपडपट्टयांची निर्मिती याचा अभ्यास करण्यात आला आहे. झोपडपट्टी निर्माण झाल्यावर झोपडपट्टीवासीयांना शहरी विकासाचा एक अविभाज्य भागच समजले जाते. रोजगाराच्या संधी शहरात उपलब्ध असल्यामुळे लोक शहरांमध्ये स्थलांतर करत असतात शहरात जिथे जागा मिळेल तेथे बांबु व पत्र्याची घरे बांधून लोक वास्तव्य करत असतात. परंतू झोपडपट्टी निर्माण झाल्यानंतर झोपडपट्टीवासीयांना विविध समस्यांना सामोरे जावे लागते त्यांचा अभ्यास प्रस्तुत शोधनिबंधामध्ये करण्यात आला आहे.

**शहरीकरणाची प्रक्रिया**

भारतात औदयोगिकरणाला सुरुवात झाली आणि औदयोगिकरणामुळे शहरीकरण होवू लागेल. शहरीकरणाच्या वाढत्या प्रक्रियेला वाढती लोकसंख्या, दारिद्रय आणि ग्रामीण भागातील स्थलांतर हे घटक कारणीभूत आहेत. गेल्या तीन दशकात शहरीकरण व विकासाची प्रक्रिया तीव्र झाल्याचे आढळते. शहरालगत असणाऱ्या गांवामध्ये नवनवीन उदयोगधंदे सुरु झाले त्यामुळे गावांचे झपाटयाने निमशहरी स्वरुपवात रुपांतर झाल्याचे दिसून येते. ग्रामीण भागात रोजगाराची अपुरी संधी सततचा दुष्काळ व नैसर्गिक आपत्ती यामुळे लोकांचा मोठा ओघ हा शहराकडे येण्याचे प्रमाण वाढले. औदयोगिकरणाच्या या वाढत्या प्रक्रियेमुळे गेल्या चार दशकामध्ये मोठया प्रमाणात लोकसंख्या वाढत असल्याचे आपल्याला आढळते.

महाराष्ट्रात शहरीकरणाच्या विविध पातळया आहेत कोकण विभागातील मुंबई, मुंबई उपनगरे, ठाणे, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्हयांतील ७२ टक्के लोक शहरात राहतात. पण त्यापैकी बहुसंख्य मुंबई, मुंबई उपनगरे, ठाणे या तीन जिल्हयात एकवटली आहेत. पुणे आणि नागपुर विभागात एक तृतीयांश लोकसंख्या शहरी भागात राहते. प. महाराष्ट्रातील सर्व जिल्हयांचा अंतर्भाव असलेल्या पुणे आणि नाशिक विभागाबरोबरच अमरावती विभागातील एक चर्तुथांश लोकसंख्या शहरी आहे. (मानव विकास अहवाल, महाराष्ट्र २००२ : १९)

राज्याच्या अनेक विभागात सध्या शहरीकरणाची प्रक्रिया तीव्र वेग घेत आहे. इ. स. २००१ मध्ये राज्यात ३७८ मोठी गावे आणि शहरे आहे. १९६१ मध्ये हीच संख्या २६६ होती याच कालावधीमध्ये शहरातील लोकसंख्या चौपटीने वाढली. १.१० कोटीवरुन ४.१० कोटीवर गेली १९६१ ते ७१ या कालावधीमध्ये शहरीकरणाचा वेग तीव्र होता. १९९१ ते २००१ पर्यंत तो मंदावला आणि ३९ वरुन ३४ टक्क्यांवर आला. केवळ खेडयातूनच नव्हे तर मोठी गावे आणि शहर येथून ही लोक मुंबई आणि आजुबाजुच्या परिसरात स्थलांतर करतात. (मानव विकास अहवाल महाराष्ट्र, २००२: १९)

**संशोधन पद्धती**

प्रस्तुत संशोधनामध्ये ग्रंथालय पद्धती वापरण्यात आली आहे. यामध्ये प्रकाशित व अप्रकाशित साहित्य, वर्तमानपत्र, इंटरनेट या दुय्यम साधनांचा वापर करण्यात आला आहे.

**संशोधनाचे महत्त्व**

प्रस्तुत शोधनिबंधामध्ये शहरीकरण आणि झोपडपट्ट्यांची वाढती संख्या याचा अभ्यास करण्यात आला आहे. तसेच झोपडपट्टीवासीयांना असणाऱ्या संमस्यांचा अभ्यास करण्यात आला आहे.

**संशोधनाची उद्दिष्टये**

१. शहरीकरणाच्या प्रक्रियेचा अभ्यास करणे.
२. शहरीकरणाला कारणीभूत असणाऱ्या विविध घटकांचा अभ्यास करणे.
३. झोपडपट्टीच्या असणाऱ्या विविध संमस्यांचा अभ्यास करणे.

**झोपडपट्ट्यांची निर्मिती**

महाराष्ट्रातील कोणतेही शहर अथवा गाव असो घरांच्या वाढत्या किमती आणि राज्याच्या तसेच देशाच्या अन्य भागातून होणारे स्थालांतर लक्षात घेता झोपडपट्टी हा तेथील एक अविभाज्य घटक होऊन बसला आहे. झोपडपट्ट्यांची आणि त्यामधील रहीवाश्यांची संख्या यामुळे मुंबईसारख्या शहरात या प्रश्नाला वगेळेच परिणाम प्राप्त झाले आहे. (मानव विकास अहवाल, महाराष्ट्र २००२ : २५)

जनगणना अहवाल २००१ मधील तपशीलानुसार आजमितीला महाराष्ट्रात १.०६ कोटी लोक झोपडपट्टयांमध्ये राहत असून त्यापैकी सर्वात मोठी आहे. आकारमान आणि लोकसंख्या या दृष्टीने ती अत्यंत अवाढव्य आहे. (मानव विकास अहवाल, महाराष्ट्र २००२ : २४)

**झोपडपट्टी म्हणजे काय?**

''औद्योगिकरण आणि शहरीकरणाच्या परिणामी झोपडपट्टया निर्माण होताना दिसून येतात. सर्व भांडवलशाही देशातील शहरी विकासाची एक वस्तुस्थिती आणि अपरिहार्य गोष्ट म्हणून झोपडपट्टी निर्माण झालेल्या दिसतात''.(देसाई व पिल्लई, १९७२:६).

''झोपडपट्टयांचे अस्तित्व प्रत्येक देशात आढळते. भारतातील महानगरांमध्ये झोपडपट्टया मोठया प्रमाणात आढळतात आणि कालांतराने त्या महानगरांचे वैशिष्ठय बनलेल्या दिसून येतात. भारतामधील झोपडपट्टयांना वेगवेगळया राज्यात वेगवेगळया नावाने संबोधले जाते. महाराष्ट्रात त्यांना झोपडपट्टी, गलिच्छ वस्ती किंवा चाळ म्हणतात. दिल्लीमध्ये त्यांना “कटरा”किंवा झुग्गी म्हणतात. चेन्नई मध्ये चेरीस, तर कोलकात्यामध्ये वस्ती आणि कानपूर मध्ये “आहटा” म्हणतात'' (राव रत्ना, १९९०:२).

वरील व्याख्यांवरुन असे म्हणता येईल की, झोपडपट्टया हे महानगरांचे वैशिष्टय बनत चालल्या आहेत. झोपडपट्टी वासीय हे शहरी विकासाला झालेला एक परिणाम आहे. असे म्हणल्यास काही हरकत नाही असे वाटते.

**झोपडपट्टीच्या समस्या**

''महाराष्ट्रात नागरीकरणाचा वेग अधिक आहे आणि लोकांना परवडणाऱ्या किमतीत घरे पुरविणे एका मर्यादेच्या पलीकडे अशक्य आहे, तेथे झोपडया हे एक वास्तव आहे. भारतातीलच नव्हे, तर अशियातील सर्वात मोठया झोपडपट्टीचा 'मान' मुंबईने पटकावला आहे. धारावी ही केवळ एक वस्ती नाही तर एक ओदयोगिक केंद्र आहे आणि तेच त्या झोपडपट्टीच्यावाढीचे तसेच विनाशाचे कारण आहे. गर्दीने खच्चून भरलेल्या या वस्तीत मुलभूत सुविधांच्या नावाने मात्र ठणठणाट आहे'' (मानव विकास अहवाल महाराष्ट्र, २००२: २४).

**१. शिक्षण**

झोपडपट्टीवासीयांच्या मुलांच्या शिक्षणावर होणारा खर्च सर्वात कमी व अगदी नगण्य आहे. (१.०७ टक्के) यासाठी झोपडपट्टीवासीयांच्या शैक्षणिक विकासासाठी खास कार्यक्रम राबवण्याची आवशकता आहे. (धनवडे सतीश,२००६, :६६) झोपडपट्टीमध्ये शिक्षणाची समस्या मोठया प्रमाणात असल्याचे आढळते. या समस्येला घरातील आर्थिक स्थिती कारणीभूत ठरत असल्याचे आढळते. प्राथमिक शिक्षण घेतल्यानंतर मुलांच्या माध्यामिक व उच्च शिक्षणाचा खर्च मोठयाप्रमाणात असतो. त्यामुळे शिक्षणामध्ये मुलांची संख्या खुपच कमी आहे. आर्थिक स्थिती, शिक्षणातील रुची, अपुऱ्या शिक्षणसुविधा यामुळे येथील मुलांचे शिक्षणाचे प्रमाण कमी असल्याचे आढळते.

**२. गुन्हेगारी**

झोपडपट्टीत रहायला येणारे लोक विविध कारणांनी आलेले असतात. उदा. खेडयातून शहरात, गरीबी, आर्थिक अस्थैर्य, नैसर्गिक आपत्ती, सामाजिक कारणामुळे स्थलांतर केलेले असते. “शिक्षणाचा अभाव असल्यामुळे मुलांचा मोठयाप्रमाणात कल हा गुन्हेगारीकडे असलेला दिसतो, कारण कुशल शिक्षण मिळत नसल्यामुळे रोजगाराच्या संधी कमी प्रमाणात असल्याचे दिसते.” रोजगाराच्या संधी कमी

असल्यामुळे आपल्या आर्थिक मिळकत किंवा सर्व गरजा भागवण्यासाठी मुले मोठयाप्रमाणात गुन्हेगारीकडे वळलेली दिसतात. (ीजजचेरूध्ध्मदण्उणूपापचमकपंण्वतह)

**३. आरोग्य**

पर्यावरणाची असणारी स्थिती, अस्वच्छता यामुळे आरोग्यास अनेक समस्या निर्माण होतात. मोठयाप्रमाणात रोगराई, साथीचे रोग त्वचा रोग इ. समस्या निर्माण झालेल्या आपल्याला आढळून येतात. आर्थिक परिस्थिती बेताची असल्यामुळे लोक स्वत:च्या आरोग्याकडे कमी प्रमाणात लक्ष देत असल्याचे आढळते व त्यातूनच मोठयाप्रमाणात आरोग्यविषयक समस्या निर्माण होताना दिसतात.

**१. दारिद्रय**

दारिद्रयाची समस्या मोठयाप्रमाणात आहे लोकांच्या परिवारात किमान उत्पन्नाचा दर्जा कमी असतो व त्याचा परिणाम त्यांच्या राहणीमानावर पडत असतो. ''दारिद्रयामुळे लोकांना समाजात प्रभावीपणे सहभागी होता येत नाही किंवा आपल्या प्राथमिक असणाऱ्या अन्न, वस्त्र, निवारा या गरजा पुर्ण करता येत नाहीत. त्यामुळे दारिद्रयाच्या पातळीत राहणाऱ्या लोकांची संख्या मोठयाप्रमाणात आहे.

**२. बेरोजगारी**

झोपडपट्टीमध्ये बेरोजगारीची समस्या मोठयाप्रमाणात आहे. कुशल शिक्षण, व्यावसायिक शिक्षण या सर्वाचा अभाव असल्यामुळे रोजगाराच्या संधी कमी प्रमाणात असतात आणि त्यातूनच बेरोजगारीची समस्या मोठया प्रमाणात होते

**४. झोपडपट्टीमधील स्त्रियांच्या समस्या**

झोपडपट्टीमध्ये स्त्रियांना आरेग्याची समस्या मोठया प्रमाणात आहे. आरोग्यविषयक असणारी अपूरी माहिती, यामुळे त्यांच्या आरोग्याच्या समस्या निर्माण होतात. बहुतांशी स्त्रीया हया रोजंदारीवर काम करताना दिसतात.

आरोग्याच्यादृष्टीने कामाच्या ठिकाणी आवश्यक असणारी प्राथमिक काळजी घेतली जात नाही. त्यांना लागणारे सुरक्षेचे साहित्य पुरविले जात नाही. असुरक्षितता किंवा अस्वच्छता यामुळे स्त्रियांना अरोग्यविषयक विविध समस्यानां सामोरे जावे लागते.

**५. स्वच्छतेच्या समस्या**

"अस्वच्छ पाणीपूरवठा, कोंदट वातावरण, शौचालयांचा आभाव शारीरीक स्वच्छतेकडे दुर्लक्ष यामुळे झोपडपट्टीतील लोकांच्या आरोग्याचा दर्जा खालावलेला दिसून येतो. कारण आरोग्याचा मुख्य शत्रू जी अस्वच्छता असते तीच येथे ठाण मांडून बसलेली आढळते" (धनवडे सतीश २००६ : १४).

या वरुन असे दिसते की झोपडपट्टी वासीयांना आपल्या दैनंदिन जीवनात अनेक समस्या असतात.

**निष्कर्ष**

औदयोगिकरणामुळे हळूहळू शहरीकरण होऊ लागले. रोजगाराच्या संधी शहरात उपलब्ध झाल्यामुळे लोकांचा मोठा ओघ शहराकडे येऊ लागला. शहरालगतच्या गावांचे झापाटयाने नागरीकीकरण होऊ लागले. त्याचा परिणाम म्हणून झोपडपट्टयांची संख्या वाढू लागली. शहरांमध्ये रिकामी जागा मिळेल त्या ठिकाणी लोक वास्तव्य करु लागले. झोपडपट्टीतील लोकांना अनेक समस्या निर्माण झाल्या त्याचाच परिणाम त्यांच्या जीवनावर होऊ लागला झोपडपट्टी वासीयांना अनेक समस्या असतात. उदा. दारिद्रय, बेकारी, शिक्षण, गुन्हेगारी आरोग्य परंतु सदय कालीन परिस्थितीमध्ये झोपडपट्टीवासीय एक समाजाचा घटक झाले असल्याचे आपणाला आढळून येते. सदयकालीन परिस्थितीमध्ये झोपडपट्टीवासीय हा एक अविभाज्य घटक बनला आहे.